## निशाणी ७९ वर आदेश रे.मु.नं. ३२३/२०२४

(आदेश पारित दिनांक २२/०४/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी मुदतीत कैफियत देण्यास विलंब माफ होऊन त्यांच्याविरूध्द झालेला ''विना कैफियत'' चा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या मते, सदर दाव्यात प्रतिवादी हे स्वत:हुन दि.१७/१२/२०२४ रोजी हजर झाले. त्यानंतर प्रतिवादी हे ठाणे येथे राहणेस असून त्यांना सदर दाव्याचे कामी म्हणणे व कैफियत देणेसाठी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे ही वेळेत मिळून शकली नाहीत. त्यामुळे त्यांना कैफियत वेळेत देता आली नाही. त्यासाठी २१५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी सदर विलंब मुद्दामहुन केलेला नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.८ ते १० यांना कैफियत देणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांच्याविरूध्द झालेला ''विना कैफियत'' चा आदेश रद्द होऊन अर्जासोबत दाखल केलेली कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जावर वादीने म्हणणे देवून प्रतिवादी क्र. ८ ते १० यांची कैफियत स्वीकारण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथकपणे प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.८ ते १० हे वकिलांमार्फत दि.१७/१२/२०२४ रोजी मे.न्यायालयात हजर झाले. त्यांनी दाव्यात मुदतीत कैफियत दिली नाही. त्यानंतर त्यांनी सदरचा अर्ज दि.१८.१०.२०२५ रोजी केलेला आहे. अर्जात नमूद केलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. तसेच, प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कारणांच्या पुष्ठर्थ कोणतेही कागदपत्रे अर्जासोबत दाखल केलेली नाही. परंतु अर्जाचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता प्रतिवादी क्र.८ ते १० यांचे कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.८ ते १० यांना संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र.८ ते १० यांची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादींना प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये झालेला विलंब व त्या अनुषंगाने वादींची झालेली गैरसोय योग्य त्या खर्चाची रक्कम भरणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी सदर अर्जासोबत प्रतिज्ञापत्र नि.क्र.८०

वर दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र.८ ते १० यांची कथने मान्य करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. २,०००/- च्या खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेस किंवा त्याआधी देण्याची आहे. त्यानंतरच प्रतिवादी क्र.८ ते १० यांची कैफियत अभिलेखावर नोंदवली जाईल.

३ प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केलेस प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द करणेत येईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

PRIYANKA SANJAY DHUMAL
Digitally signed by PRIYANKA SANJAY DHUMAL
Date: 2026.04.22 14:59:19 +0530

दिनांक- २२/०४/२०२६ श्रीमती पी. एस. धुमाळ

ठिकाण- पंढरपूर ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | V. S. Chintanpalli ( L. G.) |
| Court | :- | 6th Jt.C.J.J.D. Pandharpur |
| Date | :- | 22.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 22.04.2026 |
| Uploaded On | :- | 22.04.2026 |